कृपया प्रसिद्धीसाठी

# गोल्डन फ्ल्यूट : संगीताची सुरेल सफर

**'जिवलग' प्रस्तुत 'गोल्डन फ्ल्यूट' हा हिंदी गीतांच्या बासरीवरील सादरीकरणाचा कार्यक्रम दि. २५ मे २०१४ रोजी गणेश कला क्रीडा रंगमंचात होत आहे. विख्यात बासरी वादक अमर ओक तो सादर करणार आहेत. यानिमित्त .....**

संगीत वाद्यांमध्ये बासरीचे स्थान निराळेच ! लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकाला हे वाद्य आपलेसे वाटते यातच सर्व काही आले. संगीताचे पुरेसे ज्ञान असो किंवा नसो, बासरी प्रत्येकाला ठाऊक असते. बासरीचा अनाहत नाद मनाला रोमांचित करतो. कृष्णाची बासरी हा तर भारतीय परंपरेचा मोठाच ठेवा. शतकानु शतके हे वाद्य वाजत राहिले, कोट्यावधी संगीत प्रेमींना मंत्रमुग्ध करत राहिले.

गेल्या शतकापासून भारतीय चित्रपट संगीत सर्वसामान्य भारतीयांशी अतूटपणे जोडले गेले. परिणामी चित्रपट संगीताची व्याप्ती प्रचंड वाढली. हिंदी चित्रपट संगीताने सर्वसामान्य भारतीयांवर असा काही प्रभाव टाकला की हे संगीत भारतीय लोकजीवनाशी जणू एकरूप होवून गेले. हिंदी चित्रपट संगीतातील दिग्गजांनी, एकाहून एक सरस प्रतिभावंतांनी गेल्या शतकाच्या मध्याला सुवर्णयुग निर्माण केले. ते सुवर्णयुग रसिकांना आजही खुणावते. पंकज मलिक, अनिल विश्वास, नौशाद, सी. रामचंद्र, शंकर-जयकिशन यांच्यासह थोर संगीतकारांची एक मोठीच मालिका त्या काळात निर्माण झाली. आजदेखील त्यांच्या रचना श्रोत्यांना साद घालतात.

या संगीतकारांनी आपल्या रचनांमध्ये बासरीचा फार उत्तम वापर केला. सुवर्ण युगातले किंवा त्या आधीचे संगीतकार यात आघाडीवर होतेच, पण सुवर्णयुग लयाला गेल्यानंतर सुध्दा गाण्यांमध्ये बासरीची परंपरा सुरू राहिली हे विशेष. बासरीचा हिंदी चित्रपट गीतांमधील मुक्त वापर हे चित्रपट संगीताचे संचित. हे अनमोल संचित पुन्हा एकदा लोकांसमोर यावे हा 'गोल्डन फ्ल्यूट' कार्यक्रमाचा उद्देश.

पंकज मलिक यांच्यापासून आजचे आघाडीचे संगीतकार ए.आर. रहेमान यांच्यापर्यंत विविध संगीतकारांच्या रचना यामध्ये सादर करणार आहेत. ओक यांच्या 'अमर बन्सी' कार्यक्रमाने जादू घडविली. पूर्णपणे बासरीवर आधारीत कार्यक्रम, ही संकल्पनाच अभिनव होती. आता 'गोल्डन फ्ल्यूट' तीच परंपरा पुढे नेणारा कार्यक्रम ठरणार आहे.

'गोल्डन फ्ल्यूट' हे चित्रपट संगीताच्या रचनांमध्ये बासरीचा चपखल वापर करणाऱ्या संगीतकारांचे स्मरण आहे. बासरीचा वापर करून सुरावट आणखी खुलविणाऱ्या संगीतकारांच्या

प्रतिभेला मानाचा मुजरा आहे. 'गोल्डन फ्ल्यूट' हे स्मरण रंजन करीत घडणारी संगीताची सुरेल सफर आहे.

बासरी हे त्या अर्थाने साथीचे वाद्य नाही. मात्र चित्रपट संगीतावर लोकसंगीताचा प्रभाव असल्याने बासरीला संगीतकारांची पहिली पसंती मिळाली. त्याकाळी केवळ संगीतकाराच नव्हे तर निर्माता आणि दिग्दर्शक देखील संगीताचे जाणकार होते. परिणामी संगीत रचना अधिकाधीक आशयघन होत गेल्या. नौशाद यांनी अनेक गाण्यांमध्ये बासरीचा वापर केला. शंकर-जयकिशन ही त्या काळची सर्वात लोकप्रिय संगीतकार जोडी, त्यांचे वैशिष्ठ्य म्हणजे ज्या वाद्यावर ज्या वादकाचे प्रभुत्व आहे त्या वादकाला बोलावून संगीतरचना परिपूर्ण बनविणे ! म्हणूनच पन्नालाल घोष यांच्यासारख्या दंतकथा बनून गेलेल्या बासरीवादकाची शंकर-जयकिशन यांच्याकडील कामगिरी केवळ अद्वितीय. 'बसंत बहार' हा चित्रपट प्रदर्शित होवून किती दशके उलटली पण त्यातील गाणी आणि त्या गाण्यांमध्ये पन्नालाल घोष यांनी वाजविलेली बासरी आजही खुणावते. विशेषतः 'बसंत बहार' मधील 'मै पिया तेरी ....' हे अजरामर गाणे. 'बसंत बहार' चे नायक-नायिका कोण हे आज कदाचित आठवणारसुध्दा नाही, पण त्यातील गाणी हा अपवाद ! 'प्यार हुआ इकरार हुआ ....' या 'श्री ४२०' मधील गाण्यामध्ये छोट्या बासरीचा अर्थात पिकोलो फ्ल्यूटचा वापर करण्यात आला आहे. पिकोलो फ्ल्यूट एवढी लोकप्रिय झाली की तोपर्यंत तीचे स्थान पडद्यामागे होते, आता पडद्यावरील नायकच पिकोलो फ्ल्यूट वाजविताना दिसू लागला ! 'जाने कहा गये वो दिन ...' या 'मेरा नाम जोकर' मधील गाण्याने एका पिढीला अस्वस्थ केले. त्या गाण्यातही बासरी आहे. बासरीचा शंकर-जयकिशन यांच्याकडून अक्षरशः शेकडो गाण्यांमध्ये वापर झाला. त्यापैकी एक ठळक गाणे म्हणजे 'तिसरी कसम' मधील 'पान खाये सैय्या ...'.

संगीतकार सचिनदेव बर्मन यांनी अनेक मधाळ रचना दिल्या. केवळ त्यांच्या संगीताच्या आधारावर बरेच चित्रपट गाजले. 'गाईड' मधील 'वहॉ कौन हे तेरा ...', 'अभिमान' चित्रपटातील 'तेरी बिंदीया ...' आणि 'नदीया किनारे ...', 'ज्वेलथिफ' मधील 'होठों पे ऐसी बात मै दबाती चली आई ...' ही गाणी म्हणजे बासरीच्या अप्रतिम वापराची ठळक उदाहरणे. 'होठों पे ऐसी बात मै ...' या गाण्यातील ठेका तर अविस्मरणीय होता.

अभिजात रचनांचा निर्माता म्हणजे संगीतकार मदनमोहन. 'माई री मैं ...' किंवा 'दिल ढुंढता हैं फिर वही...' अथवा 'तु जो मिल गये हो ...' या त्यांच्या रचनांमध्ये बासरीने श्रोत्यांना खिळवून ठेवले.

जुन्या काळातील संगीतकारांचा विषय निघाल्यावर ऱ्हिदमकिंग ओ.पी. नय्यर यांना विसरून कसे चालेल. 'कभी आर कभी पार लागा तीरे नजर ...(आरपार)', 'ठंडी हवा काली घटा... (मिस्टर ॲण्ड मिसेसे ५५)' यांसह त्यांच्या असंख्य सुरावटींमध्ये बासरीचे खास स्थान आहे.

जयदेव या गुणी संगीतकाराने ‘ये दिल और उनकी ...’, ‘एक अकेला इस शहर मै...’, ‘अल्ला तेरो नाम...’ या गाण्यांमध्ये बासरीचा सुंदर उपयोग केला. गाण्यांची श्रवणीयता बासरीमुळे आणखी वाढल्याचे आपल्याला सर्वच संगीतकारांच्या रचनांमध्ये पहायला मिळते.

संगीतकार शिव-हरी यांच्यामुळे संगीत रचनांमध्ये संतुर आणि बासरीचा अभुतपूर्व मिलाफ झाला. ‘देखा एक ख्वाब तो ये सिलसिले हुए ...’ हे शिव-हरी यांचे सांगितिक शिखर. त्यात संतूर आहे आणि बासरीदेखील.

सलील चौधरी या संगीतकाराने स्वतंत्र वाट चोखाळली. मधुमती, माया या चित्रपटातील त्यांच्या रचना बासरीने अधिक गोड बनल्या.

खय्याम, हेमंत कुमार, कल्याणजी-आनंदजी, रविंद्र जैन यांच्यापासून आजच्या काळातील ए.आर. रहेमान पर्यंतच्या संगीतकारांनी बासरीचा उपयोग करून खुलवलेल्या रचना ‘गोल्डन फ्ल्यूट’ मध्ये अमर ओक यांच्या बासरीद्वारे सादर होतील. त्यात ‘कभी तनहाईयों में यूं ...’ या गीताचे हळवेपण आणखी वाढविणारी बासरी भेटणार आहे. ‘गोरी तेरा गाव बडा प्यारा...’ या गीताची अवखळता आणखी वाढविणाऱ्या बासरीचे सूर कानी पडणार आहेत. त्यात आर.डी. बर्मन आहेत, लक्ष्मीकांत प्यारेलाल आहेत.

प्रसिध्द संगीतकार इलाही राजा यांनी सिंफनी तत्वावर संगीतबध्द केलेली पं. हरीप्रसाद चौरसिया यांच्या बासरीचा समावेश असलेली ‘नथींग बट द विंड’ ह्या संकल्पनेचे सादरीकरण हे या प्रयोगाचे एक वेगळेच वैशिष्ठ म्हणावे लागेल.

बासरीने हिंदी चित्रपट संगीतात घडविलेले सुरेल युग या ‘गोल्डन फ्ल्यूट’ संगीताची सुरेल सफर या कार्यक्रमात पुणेकर रसिक श्रोत्यांसमोर साक्षात उभे राहणार आहेत !

---

**शब्दांकन - प्रसाद खरे**

मोबा. ९८२२११९८७८